
कला संचालनालयाची शासनाच्या प्रशासकीय विभागापर्यंतची रचना खालीलप्रमाणे आहे.



# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई

कला शिक्षणाच्या प्रसाराचे काम कला संचालनालयामार्फत महाराष्ट्रात करण्यात येत असून अखिल भारतीय स्तरावर महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, ज्या ठिकाणी कलेच्या शास्त्रोक्त प्रचार / प्रसारासाठी स्वतंत्र कला संचालनालयाची स्थापना माहे जून, १९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाने केली आहे. या संचालनालयामार्फत राज्यातील शासनमान्यताप्राप्त कला संस्थांतील विद्यार्थ्यांसाठी राज्य कला प्रदर्शन ( विद्यार्थी विभाग ), कला शिक्षणासाठी नवीन कला संस्था निर्माण करणे, त्यांना अनुदान मंजूर करणे, कला अभ्यासक्रमाची आखणी करणे व राबविणे, विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पदविका देणे तसेच व्यावसायिक कलाकारांसाठी राज्यकला प्रदर्शन भरविणे व राज्यातील दृश्य कलांचे जतन व जपणूक करणे, कलाकारांना प्रोत्साहन देणे इत्यादी कला संचालनालयाची प्रमुख वैशिष्टे / कामे आहेत .

*** शासकीय उच्चकला परीक्षा:-**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला महाविद्यालयांमध्ये दृष्य कलेचे पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. पदविका अभ्यासक्रमांची परीक्षा प्रक्रिया कला संचालनालयामार्फत राबविण्यात येते. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, परीक्षा आयोजित करणे, निकाल घोषित करणे, गुणपत्रक, प्रमाणपत्र वितरीत करणे इ. परीक्षेसंबंधीची कामे कला संचालनालयाकडून करण्यात येतात.

*** शासकीय रेखाकला परीक्षा:-**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये कला विषयाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने कला संचालनालयामार्फत दरवर्षी माहे सप्टेंबर मध्ये अखिल भारतीय स्तरावर एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा घेण्यात येतात. दरवर्षी सदर परीक्षांना अंदाजे ७.००लक्ष विद्यार्थी प्रविष्ट होतात. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, परीक्षा आयोजित करणे, निकाल घोषित करणे, प्रमाणपत्र वितरीत करणे इ. शासकीय रेखाकला परीक्षेसंबंधीची कामे कला संचालनालयाकडून करण्यात येतात.

*** कला संस्थांना मान्यता देणे:-**

नविन कला संस्था / जुन्या कला संस्थेत नवीन अभ्यासक्रम / नविन तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.एडीआर-२०१४/प्र.क्र.१८८/तांशि-६, दि.१६.०३.२०१६ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच कला संचालनालयाच्या कक्षेतील नवीन कला महाविद्यालयांना मान्यता देणे, जुन्या कला महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणे, परीक्षा केंद्र देणे अथवा बंद करणे यासाठी शासन निर्णय क्र.एडीआर २७१४/प्र.क्र.२२/१७/तांशि-६, दि.२२/०९/२०१७ अन्वये संचालकांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार खाजगी कला महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबतची कार्यवाही कला संचालनालयाकडून करण्यात येते. तसेच शासन निर्णय क्र.एडीआर १४०६(१/६)साशि-५, दि.०५/०७/२००६ अन्वये कला संचालनालयाकडे विविध व्यवस्थापनांकडून नवीन संस्था/अभ्यासक्रम/तुकडी तसेच कला विषयातील नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जासाठी नोंदणी शुल्क आकारण्यात येते. वर नमूद सर्व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

*** राज्य कला प्रदर्शन:-**

राज्यातील व्यावसायिक कलाकार तसेच राज्यातील शासन मान्यताप्राप्त कला महाविद्यालयांतील विद्यार्थी यांच्या कला प्रदर्शित करण्यासाठी व त्यांच्या प्रतिभा शक्तीला

हक्काचे व्यासपीठ असावे तसेच त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे या हेतूने कला संचालनालयामार्फत सन १९६५ पासून दरवर्षी कलाकार विभाग व विद्यार्थी विभाग या दोन विभागांमध्ये राज्यस्तरीय कला प्रदर्शन आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील कला क्षेत्रात अव्याहतपणे आणि निष्ठेने कार्य करणा-या ज्येष्ठ कलाकारांचा सत्कार करण्याची प्रथा या प्रदर्शनानिमित्ताने शासनातर्फे सन १९८५ पासून सुरु करण्यात आली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.अेडीआर-२०१६/प्र.क्र.४५/तांशि-६, दि.२३.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनामध्ये देण्यात येणारी पारितोषिके आणि गौरव मानधनाच्या रकमेत सुधारणा करुन वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार कलाकार व विद्यार्थी विभागातील पारितोषिक विजेते कलाकार व विद्यार्थी यांना पारितोषिक रक्कम अदा करण्यात येते.
तसेच महाराष्ट्रातील कला क्षेत्रात अव्याहतपणे आणि निष्ठेने कार्य करणा-या ज्येष्ठ दोन कलाकारांचा कलाकार व विद्यार्थी विभागात प्रत्येकी १ या प्रमाणे गौरव मानधन, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येतो. क्र.अेडीआर-२०१६/प्र.क्र.४५/तांशि-६,दि.२३.०१.२०१९ चा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

*** वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार:-**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.एडीआर-२०१९/प्र.क्र.९४/तांशि-६, दि.०२.०१.२०२० अन्वये दृष्यकला क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या नामवंत व ज्येष्ठ कलाकारांचा यथोचित सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन २०१९-२० पासून रु.५.००लक्ष, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार देण्यास शासनमान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाच्या वतीने कला संचालनालयामार्फत सदर पुरस्कार राज्य कला प्रदर्शनातील कलाकार विभागाच्या उदघाटन प्रसंगी देण्यात येतो.

*** दुर्मीळ व ऐतिहासिक कलाकृती / पेंटिंगचे जतन व संवर्धन करणे :-**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई येथे ख्यातनाम चित्रकारांच्या सुमारे २५०० ऐतिहासिक, दुर्मीळ व मौल्यवान कलाकृती उपलब्ध आहेत. सदर दुर्मीळ व मौल्यवान कलाकृतींचे जतन व संवर्धन करण्यासाठी वार्षिक योजनेतून दरवर्षी शासनाकडून निधी मंजूर करण्यात येतो. त्यानुसार सदर निधीमधून दुर्मिळ व मौल्यवान कलाकृतींचे जतन व संवर्धन करण्यात येते. कला संचालनालयामधील दुर्मीळ व मौल्यवान कलाकृतींचा संग्रह हा ललित कला क्षेत्रात शैक्षणिकदृष्ट्या, तसेच कलाजगतास मार्गदर्शक असा मौल्यवान ठेवा आहे. सदर कलाकृतींचे संवर्धन करण्यात आल्यामुळे त्या कलाकृती विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून दीर्घकाळ उपलब्ध होतील.

*** बाल चित्रकला स्पर्धा:-**

बालकांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्यामध्ये कला विषयक अभिरुची निर्माण व्हावी याकरिता दरवर्षी ऑगस्ट महिन्यात शालेय स्तरावर बाल चित्रकला स्पर्धा निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत आयोजित करण्यात येते. सन १९७० पासून स्वर्गीय पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी या स्पर्धेतील बक्षीस विजेते विद्यार्थ्यांना बक्षीसे वितरित करण्यात येतात. स्पर्धेतील उत्कृष्ट कलाकृतींना चार गटात प्रत्येक गटात ३ बक्षीसे याप्रमाणे एकूण १२ बक्षीसे देण्यात येतात. तसेच २० स्पर्धकांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात येतात.

------x-----